Email – dsimwrdgom@gmail.com / wrd.cad.do.imp@maharashtra.gov.in
Tel.No. 022-22027895, 22794161. Fax No. 022-22023213, 22834335, 22831817

**महाराष्ट्र शासन**

**"जलसंपदा विभागाच्या संकेतस्थळास कृपया भेट द्या** https://wrd.maharashtra.gov.in"

क्रमांक:. बिसिंआ २०१५/(१७४/१५)/सिं.व्य.(धोरण)

जलसंपदा विभाग,
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक :- १९ जानेवारी, २०१६

प्रति,
मुख्य अभियंता (विप्र),
जलसंपदा विभाग, पुणे.

**विषय:** उजनी प्रकल्पाचे जलाशयातून औद्योगिक वापरासाठी वार्षिक ७.५७ द.ल.घ.मी. पाणी पुरवठा परवानगीची मुदतवाढ देण्याबाबत.
**संदर्भ:** आपले जा. क्र. मुअ (विप्र)/उअ -३ प्रशा-८/बिल्ट ग्राफिक्स/मु.वा/१५८६/२०१५ दिनांक २० मार्च, २०१५ चे पत्र.

उपरोक्त विषयी कळविण्यात येते की, "बिल्ट ग्राफिक्स पेपर प्रॉडक्ट प्रा. लि." (पूर्वीची सिनार मास पेपर अँड पल्प इंडस्ट्रिज लि. कंपनी) या कंपनीस जलसंपदा विभाग, शासन ज्ञापन क्र. सी.डी.अे.-२९३/२३१४/४५७/९० लाक्षेवि (पावोकृ), दिनांक १० जानेवारी, १९९५ अन्वये २० वर्षाच्या कालावधीसाठी (माहे जानेवारी, २०१५ पर्यंत) उजनी प्रकल्पाचे जलाशयातून औद्योगिक वापरासाठी वार्षिक ७.५७ द.ल.घ.मी. पाणी पुरवठा परवानगी देण्यात आली होती. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम -२००५ सुधारणा करण्याकरिता अधिनियम, दि. २२/०४/२०११ मधील कलम ३१ ख व ३१ ग मधील तरतूदीनुसार सदर कंपनीची मंजुरी दि. १७/०९/२०१० पूर्वीची असल्याने पूर्वी देण्यात आलेली पाणी वापर परवानगी अबाधित राहणे क्रमप्राप्त आहे. सबब, सदर कंपनीस वार्षिक ७.५७ द.ल.घ.मी. पाणी वापर परवानगीस खालील अटींच्या अधीन राहून कायमस्वरुपी मंजुरी देण्यात येत आहे.

१) अर्जदार कंपनीने बांधून कार्यान्वित केलेल्या योजनेचे परिचालन व देखभाल दुरुस्ती कंपनी स्वखर्चाने करावी.
२) सर्वप्रथम विहित नमुन्यात अर्जदार कंपनीने संबंधित कार्यकारी अभियंत्यांबरोबर हे पत्र प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून १ महिन्याच्या आत करारनामा करावा. करारनामा केल्यानंतरच पाणी परवाना मंजूरी कार्यान्वित होईल.

३) शासनाने वेळोवेळी ठरविलेल्या पाणीपट्टीच्या दराने पाणी पुरवठ्यासाठीची आकारणी केली जाईल. आणि विहित मुदतीत ही पाणीपट्टी आकारणी अर्जदार कंपनीस शासनाकडे भरावी लागेल.

४) पाणी पुरवठ्याचे संबंधात प्रचलित नियम व शासनाने वेळोवेळी विहित केलेले नियम व अटी अर्जदार कंपनीवर बंधनकारक राहतील.

५) जलाशयातील पाण्याच्या दर्जाबाबत जलसंपदा विभाग जबाबदार राहणार नाही व त्यास जबाबदारही धरता येणार नाही.

६) योजनेत वापरलेले पाणी दुषित स्वरुपात जलाशयात सोडले न जाण्याची खबरदारी अर्जदार कंपनी घेईल. तसे न केल्यास त्यास अर्जदार कंपनी पूर्णत: जबाबदार राहील. अशा प्रकारे वापरलेल्या पाण्याची शुध्दीकरण व्यवस्था करावी लागेल व त्याची विल्हेवाट लावण्यासंदर्भात महाराष्ट्र जलप्रदुषण मंडळाचे "ना हरकत प्रमाणपत्र" करारनामा करण्यापूर्वी सादर करावे लागेल.

७) जलस्त्रोत प्रदुषित करणाऱ्या पाणी वापरकर्त्याकडून दंडनीय पाणीपट्टी आकारणी करणेबाबत शासन निर्णय क्र. पापव-२०१३/(प्र.क्र. ४६६)/२०१३/सिं.व्य. महसूल) दिनांक१२/११/२०१३ मधील अटींचे पालन करणे संस्थेस बंधनकारक राहील.

८) पाणी मापक यंत्राची व्यवस्था कार्यकारी अभियंत्याचे पूर्व संमतीने कंपनीने ठरवून ती स्वखर्चाने करावी. ही व्यवस्था सदैव उत्तम स्थितीत ठेवण्याची जबाबदारी कंपनीची राहिल. ही व्यवस्था जलसंपदा विभागाचे अधिकारी केव्हाही तपासू शकतील. ह्या व्यवस्थेवर आधारित पाणी वापराचा दैनंदिन अभिलेख अर्जदारास ठेवावा लागेल. हा अभिलेख जलसंपदा विभागाचे अधिकारी केव्हाही तपासू शकतील. हा अभिलेख नीट ठेवल्याचे न दिसून आल्यास पाणी वापरासंबंधीचा अंदाज जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता ठरवतील व हा अंदाज अंतिम राहिल व अर्जदारावरही तो बंधनकारक राहिल.

९) ही मंजूरी म्हणजे पाणी पुरवठ्याची हमी नव्हे. नैसर्गिक कारणांमुळे किंवा इतर काही अपरहिार्य कारणांमुळे जलाशयात पाणी कमी पडल्यास मंजूर पाणी पुरवठ्याबाबत शासन जबाबदार राहणार नाही. कमी पाणी उपलब्धतेच्या वर्षात त्या वर्षापुरती मंजुर पाणी पुरवठ्यात कपात करण्याचा अधिकार जलसंपदा विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना राहिल. परिणामी कोणत्याही प्रकारच्या नुकसानीची जबाबदारी शासनावर राहणार नाही.

१०) पाणी जलाशयातून थेट उचलण्यात यावे.

उपरोक्त अटींचा समावेश करुन सदरहू कंपनी सोबत सुधारित करारनामा करण्यात यावा व पुढील आवश्यक कार्यवाही आपल्या स्तरावर करण्यात यावी ही विनंती.

(न. दौ. सहारे)
शासनाचे अवर सचिव

प्रत:

अधिक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, सोलापूर.
सिंव्य (धोरण) संग्रहार्थ.

C:\Randive\२०१५\CR १६४ (१५) ०५०८२०१५.docx